# ग्रामीण महिलांचे दूधव्यवसायातून सशक्तीकरण

**संशोधक विध्यार्थी: नम्रता अर्जुन इंगवले** समाजशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
namrataingavale1980@gmail.com Mob.8007473158

---

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधीच्या विचारानुसार देशाचा विकास साधायचा असेल तर प्रथम खेड्याचा विकास होणे गरजेचे आहे. म्हणजेच भारताचा विकास हा खेड्याच्या विकासामध्येच सामावला आहे. भारतीय खेड्यातील 90% लोक हे शेतीवर अवलंबून आहेत.शेतीला प्राधान्य दिले जाते पण आज भारतीय शेती ही अनियमित निसर्गचक्रावर अवलंबून आहे. सततच्या अनियमित पर्जन्यामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. शेतीच्या उत्पादनातील वाढता खर्च व शेतीच्या उत्पन्नातील घट हे समीकरण मिळते जुळते नाही शिवाय भूमिहीन,अल्पभूधारक,शेतमजूर यांना शेतीत राबणे नकोसे झाले आहे. या परिस्थितीचा विचार करता शेतकऱ्यांना व शेतीला पूरक असलेला दूधव्यवसाय हा एक प्रमुख जोडव्यवसाय बनला आहे.

दुग्धव्यवसायामुळे ग्रामीण लोकाना रोजगार संधी उपलब्ध झाली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये दूध व्यवसायाने क्रांतीच केली आहे. सुरवातीस दुधाचे उत्पन्न कुटुंबापूर्तेच मर्यादित होते. पण पुढे 1958 मध्ये महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र ‘दूध व्यवसाय विकास विभागाची’ स्थापना केली आणि अल्पभूधारक,भूमिहीन,शेतमजूर,बेरोजगारांना एक नवी दिशा मिळाली.1960 साली ग्रामीण भागातील दुधाची स्वीकृती शहरी भागामध्ये झाली आणि घरगुती दूध उत्पादनापासून सुरवात होऊन शहरी भागापर्यंत दूध निर्यात होऊ लागले. ग्रामीण भागातील पुरुष आणि महिला यांना नवी रोजगाराची एक संधी मिळाली. विशेषतः महिलांसाठी दूध व्यवसाय एक उन्नतीचे एक साधन बनले. ग्रामीण महिला समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करू लागल्या.

- **अभ्यासाचा उदेश:-**

प्रस्तुत संशोधन लेखाचा उद्देश हा महिलांचे सबलिकरण या संकल्पनेचे अध्ययन करणे आणि ग्रामीण समाजातील महिलांचे दुग्ध व्यवसायातून होणारे आर्थिक सबलिकरण अभ्यासणे हा आहे.

- **अभ्यासपद्धती :-**

सदर संशोधन लेख हा द्वितीय तथ्य संकलन साहित्यावर अवलंबून आहे. त्याकरिता पूर्व साहित्य, शोध निबंध ,विविध संशोधन लेख, पुस्तके यांचा वापर करून संबंधित विषयाचे समाजशास्त्रीय विश्लेषण केले.

- **भारतीय महिला पूर्वस्थिति -**

भारतीय संस्कृति ही पुरुषप्रधान संस्कृति आहे. वैदिकपूर्व काल हा मातृप्रधान होता. त्याकाळी स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीचे धार्मिक विधी व सर्व संस्कारांचे सामाजिक अधिकार प्राप्त झाले होते. वेदांचा अभ्यास करणे,पठण करण्याचा अधिकार होता. काही विदुषी यांना ऋषि चा दर्जा दिला गेला त्यानाही वेद पठण, सुक्ते लिहणे समाज मान्य होते. वयाच्या आठव्या वर्षांपासून वेदांचे अध्ययन करण्याची मुभा होती. स्त्रियांचा वेध अध्यनामध्ये दोन प्रकार होते 1)सध्योद्वाहा 2) ब्रम्ह वादिनी. सध्योद्वाहा चा अर्थ स्त्रीला तिच्या विवाहापर्यंत अध्ययन करता येत होते व ब्रम्ह वादिनी याचा अर्थ अविवाहित राहून अखंड ज्ञानोपासना करणे.उदा. लोपामुद्रा, गार्गी ,मैत्रेयी ,सुलभा,वाचकनवी यांनी शिक्षिका, तत्वज्ञ,वादविवादपटू म्हणून समाजामध्ये त्या काळी आपला ठसा उमटवला होता. समाजामध्ये त्यांची एक प्रतिष्ठा होती पण ती त्या पुरतीच मर्यादेत आणि अपवादात्मक ठरली. समाजातील सर्वच स्त्रियाना तो अधिकार मिळाला नाही. हे त्या काळचे विदारक सत्य होते.

काळाच्या ओघात समाजामध्ये स्त्री जीवन परावलंबी बनले .लहानपणी पिता, तरुणपणी पती, म्हातारपणी मुलगा अशी स्त्रियांची विभागणी केली गेली. थोडक्यात स्त्रीला परावलंबीत्व समाजाने बहाल केल.मनू स्मृतिच्या काळामध्ये स्त्रियांचे उपनयनाचे संस्कार काढून घेण्यात आले. स्त्रियांच्या प्रगतीच्या वाटा बंद करण्यात आल्या. तिला पूर्णपणे दुबळी बनवण्यात आले. वेदाध्ययन व उपनयन अधिकार बंद झाल्याने स्त्रीच्या प्रगतीचा मार्ग खुंटला.

सुरवातीपासूनच जर सर्व महिलांसाठी शिक्षणाची कवाडे उघडली असती तर आज स्त्री स्वावलंबी,कर्तुत्ववान बनली असती. तिच्यावर अन्याय अत्याचार ही झाले नसते. सर्व क्षेत्रामध्ये पुरुषाबरोबरीने आपले स्थान निर्माण केले असते आणि लिंगभेदवर आधारित समाजातील रचना नष्ट होऊन कुटुंबाची,समाजाची पर्यायाने देशाची प्रगती झाली असती.

भारतीय समाजसुधारणेच्या चळवळीने स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याची एक नवी दृष्टी दिली . स्त्रियांचा समाजातील स्थान ,दर्जा यामध्ये परिवर्तन झाले. स्त्री-पुरुष समानतेचा दृष्टिकोण दृढ बनत गेला त्या करिता महात्मा जोतिबा फुले,क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे,आगरकर,डॉ. बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शाहू महाराज,अशा अनेक समाजसुधारकांचे योगदान मोलाचे ठरते. त्यांच्या कार्यामुळे आज स्त्री सामाजिक, आर्थिक,राजकीय अशा अनेक क्षेत्रांमध्ये संचारास सुरवात करू लागली. तिला तिच्या प्रभाव क्षेत्राची जाणीव होऊ लागली.1920 ते 1947 हा काळ स्त्रीयांच्या साठी अत्यंत प्रेरक ठरला अबला, दुबळी समजली जाणारी स्त्री ही गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढयामध्ये सहभागी झाली एवढेच नाहीतर सुभाषचंद्र बोस यांच्या लष्करातही सहभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्यता विरोधी लढ्यात सहभागी होऊ लागल्या संघटनाचे सामर्थ्य समजू लागले. आत्मभान आलेल्या स्त्रियां संभोवतालचे जग ओळखून स्वतः मध्ये बदल होणे अपेक्षित आहे याची जाणीव होऊ लागली.

एकीकडे विकासाचे चित्र आणि दुसरीकडे सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रीचे कौटूबिक व सामाजिक जीवन विरोधाभासाचे होते. बदलाचे चित्र हे वरवरचे होते. समाजातील पुरुषप्रधानता ,पारंपरिक दृष्टिकोनाचा प्रभाव कायम होता. विकासाच्या नावाखाली स्त्रियाना आणखीनच दुय्यमत्व आले. आणि स्त्रीयांना चूल आणि मूल हेच विश्व बनले. स्त्रियांना असमानतेची वागणूक मिळू लागली. पुरुषप्रधानतेपुढे स्त्री पुन्हा अबला बनली आर्थिक विषमता वाढू लागली आत्मनिर्भरपणा हरवून गेली. यातूनच महिला संबलिकरण ही प्रक्रिया पुढे आली.

- **महिला सबलिकरण अर्थ, व्याख्या:-**

"One is not born, but rather becomes a woman.'' स्त्री जन्मत:च स्त्रीत्व घेऊन जन्माला येत नाही तर समाजातील पुरूषप्रधान संस्कृति तिला स्त्रीत्व बहाल करत असते.असे फ्रेंच स्त्रीवादी लेखिका Simone De Beauvoir यांनी आपल्या The Second Sex या पुस्तकांमध्ये समाजातील पुरुषप्रधानता आणि स्त्री दुय्यमत्व या स्थितीबद्दल प्रखर लिखाण केले. ही स्थिति पाश्चात्य देशा मध्ये होती. भारतामध्ये ही परिस्थिति काही वेगळी नाही. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी स्त्री पुरुष समानता आणण्यासाठी अनेक स्त्री चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. मुळात भारतीय राज्यघटनेनेच स्त्री-पुरुष समानता बहाल केली आहे पण ती अजूनही समाजामध्ये दिसून येत नाही. जाणीवपूर्वक प्रयत्न करूनही अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. खऱ्या अर्थाने 19व्या शतकामध्ये महिला सबलिकरण ही प्रक्रिया वेग धरू लागली ``व्हीडिकेशन ऑफ द राइट्स ऑन वुमन ''हे मेरी वुलस्टोन क्राफ्ट यांची पहिली साहित्यकृती की जी महिला हक्कांसाठीची सनद मानली गेली.या पुस्तकामध्ये महिला सबलिकरणसाठी पुरुषयांबरोबरीने स्त्रीयांना हक्क मिळाले पाहिजेत स्त्री ही पुरुषाइतकीच विचारक्षम,विवेकी ,कर्तबगार आहे आणि म्हणून ते सर्व अधिकार जे पुरुषांना आहेत ते तिलाही मिळाले पाहिजेत असे आपल्या लेखात स्पष्ट केले आहे.

1857 मध्ये शिकागो मध्ये महिला कामगारांनी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाना वेतन मिळावे आणि कामाचे तास कमी व्हावेत याकरिता संप पुकारला. याची आठवण म्हणून 1910 पासून 8 मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. 2001 साल हे महिला सबलिकरण वर्ष मानले जाते याच करीत महिला सबलिकरण अर्थ आणि प्रक्रिया,घटक समजून घेण महत्वाचे आहे.

- **महिला सबलिकरण व्याख्या:-**

विल्सन- "स्त्रियांचे दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी निर्माण झालेली जागृती आणि स्त्रीयांना त्यांच्या खऱ्यखुऱ्या क्षेत्रापर्यन्त जाण्याचा मार्ग सुरळीत करणारी प्रक्रिया म्हणजे स्त्री सबलिकरण होय."

कुमुद शर्मा- "स्त्री सबलिकरण म्हणजे स्त्रियांनी स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यापासून ते पारंपारिक सत्ता संबंधचा निषेध नोंदवण्यासाठी एकत्र येणे.''

थोडक्यात स्त्रीने स्वतःच्या क्षमता ओळखून त्या क्षमतांचा विकास करणे आणि कौटुंबिक आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग घेणे, स्वतःच्या समस्या ओळखून त्या समस्येचे स्वतःच निराकरण करण्यास प्रयत्न करणे, कोणतेही काम आत्मविश्वासाने पार पाडणे म्हणजेच सबलिकरण होय.

- **महिला सबलिकरणातील घटक-**

महिला सबलिकरणाचे अनेक घटक अपेक्षित आहेत पण प्रामुख्याने सामाजिक सबलिकरण, आर्थिक सबलिकरण,राजकीय सबलिकरण, शैक्षणिक सबलिकरण अभ्यासणे महत्वाचे आहे.

- **ग्रामीण दूध व्यवसायातून महिला सबलिकरण-**

ग्रामीण भागातील महिला या दिवस भर शेतात काम करून आपला उदरनिर्वाह करत असतात. अल्पभूधारक,भूमिहीन,महिला या पुरुषांबरोबरीने काम करत असतात. पण हे काम करत असताना स्त्रीला पुरुषा बरोबरीने वेतन दिले जात नाही. या ठिकाणी वेतन विषमता दिसून येत. या स्थिति मध्ये ती आपल्या कुटुंबाचा योग्य प्रकारे उदरनिर्वाह करू शकत नाहीत.त्याकरिता जोड व्यवसाय म्हणून दूध व्यवसाय एक उत्तम व्यवसाय आहे. जो आठवड्यातून एकदा दूध बिल घेऊन माहीलांचा खर्चाचा प्रश्न सोडवतो . महिलाना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करतो.

1. **आर्थिक सबलिकरण :-**

सबलिकरणाच्या प्रक्रियेत महत्वाचा घटक म्हणजे आर्थिक घटक होय. कारण आजची समाज व्यवस्था ही पुरुषप्रधान ही राहिली नाही आणि स्त्री प्रधान ही राहिली नाही तर ती अर्थ प्रधान बनली आहे . सर्व समस्यांचे मूळ हे आर्थिक असते. समाजात आर्थिक सुबत्ता असेल तरच समाजात स्थान,प्रतिष्ठा प्राप्त होत असते. महिलाना आर्थिक स्वावलंबी बनून अनेक रोजगार निर्मिती करता येईल जेणे करून दुसऱ्या महिलांनाही त्याचा फायदा मिळेल.ग्रामीण भागातील महिलांचे दुग्ध व्यवसायातून मोठ्या प्रमाणात सबलिकरण होताना दिसत आहे. दुधातून मिळणांऱ्या बिलातून कुटुंबाचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी हातभर लागत आहे. कुटुंबातील अनेक मोठे निर्णय घेण्यामध्ये सहभाग घेत आहेत. आर्थिक सुबत्ता आल्याने व्यवहार चातुर्य ,आत्मविश्वास ,धाडसिपणा,निर्णयक्षमता निर्माण झाली. त्यांचे काही अंशी शोषण थांबले आणि महिला सबल होण्याचा नवीन मार्ग खुला झाला.

व्यवहार चातुर्य ,आत्मविश्वास ,धाडसिपणा,निर्णयक्षमता निर्माण झाली. त्यांचे काही अंशी शोषण थांबले आणि महिला सबल होण्याचा नवीन मार्ग खुला झाला .

2. **शैक्षणिक सबलिकरण-**

महिला सबलिकरणामध्ये अत्यंत महत्त्वाचा घटक हा शैक्षणिक सबलिकरण हा आहे. भारतामध्ये 2011 च्या जनगणनेनुसार 80.88% पुरुष साक्षरता प्रमाण तर स्त्रियांचे प्रमाण 64.66% ईतके प्रमाण आहे. महिला निरक्षर प्रमाण जास्त आहे.स्त्रीला जर निर्भर, अबला बनवायचे असेल तर तिला शिक्षण देणे महत्वाचे आहे.मुलगा मुलगी शिक्षणामध्ये दुजाभाव नकरत समान शिक्षण दिले पाहिजे. महात्मा गांधींच्या मते ,``स्त्रियांच्या पुनरुजीवणाचे शिक्षण हे प्रभावी एक साधन आहे.''

दूध व्यवसायातिल उत्पनातून कुटुंबातील मुलांचे शिक्षण ,त्याच बरोबर महिलेला दूध सहकारी संस्थेतील सर्व व्यवहार समजून घेण्यास मदत मिळेल स्त्री शिक्षित असल्यामुळे तिची फसवणूक होणार नाही. तिचे स्वावलंबन वाढेल. आज स्त्री शिक्षित असल्याने अनेक दूध सहकारी संस्था त्या स्वतः सदस्य,संस्थाचालक म्हणून काम पहातात .

समाजात मान दर्जा मिळाला. व खऱ्या अर्थाने महिला दूध व्यवसायातून सबल बनत चालली आहे.

3) **राजकीय सबलिकरण -**

ग्रामीण भागातील महिला दूध व्यवसायातून राजकीय वर्चस्व प्रस्थपित करत आहेत. आर्थिक सुबता ,शिक्षण यामुळे स्त्रीयांच्या मध्ये निर्णयक्षमता, संघटन, व्यवस्थापन, व्यवहारचतुर्य वाढले. कुटुंबाची साथ मिळाल्यामुळे माहिलामध्ये आत्मविश्वास निर्माण होत आहे. त्यामुळे दूध संस्थाचा कारभार,पंचायत राज्य संस्थांचा कारभार त्या काही अंशी तरी सुरळीत पार पाडत आहेत.

4) **सामाजिक सबलिकरण -**

स्त्रीयांच्या सामाजिक सबलिकरणाचा विचार करता आर्थिक सबलिकरण झाले . शिक्षणांमुळे स्त्रियांच्या वरील सामाजिक बंधने काही अंशी शिथिल होण्यास मदत झाली.दूध व्यवसायातून सहकारी सभेला हजर राहणे, आपले मत देणे, गावातील सण समारंभ ,सभा, चावडीवरील प्रश्न मध्ये सहभाग घेऊ लागल्या. हुंडाबळी,अत्याचार याना आळा बसू लागला.दूधव्यवसाय सबंधी व स्वतःच्या प्रश्न बदल मोर्चे, आंदोलन करू लागल्या अनेक सामाजिक प्रश्नांबदल चर्चा करू लागल्या.आणि खऱ्या अर्थाने सबलिकरांची प्रक्रिया यशस्वी होऊ लागली.

- **निष्कर्ष -**

महिला सबलिकरण ही प्रक्रिया तशी खूपच व्यापक स्वरूपाची आहे पण ग्रामीण भागातील दूध व्यवसायातून ही प्रक्रिया अभ्यासत असताना समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीचा अजूनही प्रभाव असलेला दिसतो. महिलांचे संपूर्णरित्या सबलिकरण झाले नसले तरी दूध व्यवसाय हा तिच्या प्रगती साठी एक सुवर्ण मार्ग ठरला आहे. दूध व्यवसायातून महिला समाजामध्ये आपले स्थान निश्चित करताना दिसते आहे. ग्रामीण भागातील ग्रामपंचायत निवडणूक, प्राथमिक सहकारी दूध संस्था पंचवार्षिक निवडणूक या मध्ये सहभाग तसेच दूध व्यवसायातील बीलांच्या माध्यमातून बँक व्यवहार, बचत गट माध्यमातून व्यवहार कौशल्य त्याचप्रमाणे आपल्या कुटुंबामध्ये निर्णय घेणे आणि तो अंमलात आणणे अर्थात तिच्या निर्णय

क्षमतेला वाव प्राप्त होताना दिसत आहे. मात्र हे चित्र ज्या ग्रामीण कुटुंबामध्ये शैक्षणिक सुबता आहे त्याच कुटुंबामध्ये महिलांचे सशक्तीकरण झाले किंबहुना होताना दिसत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून ग्रामीण स्त्रियांना शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध केली तर नक्कीच स्त्रिया या सक्षम बनतील आणि भारत देश हा विकसनशीलतेकडून विकसित होण्यास मदत होईल

**संदर्भसूची:-**

1. रेखा पुरेकर(१९९३); "इम्पक्ट ऑफ मिल्क को. ऑपरेटीव्ह ऑन द लाईफ ऑफ रूरल वुमन इन विलेज इन महाराष्ट्र",शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
2. रोहिणी पाटील(२००३); "सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे संबलिकरण,"शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
3. सुजाता गोखले(२००७); "को. ऑपरेटीव्ह अँड डेवलपमेंट स्टडी ऑफ वुमन डेअरी को. ऑपरेटीव्ह सोसायटी इन करवीर ऑफ कोल्हापूर डिस्ट्रिक", शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
4. डॉ. रचना माने(२०१३); "स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप"अक्षर दालन, कोल्हापूर
5. प्रा.एम. यू. मुलाणी(२००६); "महिला स्वयंसहाय्यता बचत गट",डायमंड पब्लिकेशन पुणे.
6. मोहित म. चौगुले.(२०१५); "फायदेशीर पशुपालन" तेजस पब्लिकेशन कोल्हापूर.
7. डॉ. प्रदीप आगलावे(२०००); "संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे",विद्या प्रकाशन नागपूर.
8. www.wikipedia.org